# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ या महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ, अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्यविद्यापीठ)

## पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली, जि. गडचिरोली

जा./क्र./ 1466 दि. ०६/०२/२०२४

प्रति,

मा.प्राचार्य,

....................................

....................................

....................................

**विषय : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी झाडीबोली नाट्यसंमेलनातील एकांकिका स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची एकांकिका सहभागी होण्यासाठी पाठविण्याबाबत...**

**महोदय,**

वरील विषयी सविनय सेवेत अर्ज सादर करण्यात येतो की, दिनांक २७ फेब्रुवारी२०२४ रोजी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे मा.कुलगुरू, डॉ.प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाने, झाडीबोली नाट्यसंमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे . झाडीपट्टीतील सामाजिक समस्या, भाषा, आचार,विचार, संस्कृती यांची ओळख व अभ्यास करण्याच्या दृष्टीने आणि झाडीपट्टी रंगभूमीचे जतन व संवर्धन करणे या उद्देशाने, गोंडवाना विद्यापिठांतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा हा या संमेलनामागचा हेतू आहे.

तरी झाडीबोली नाट्यसंमेलनासाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची एक एकांकिका या स्पर्धेसाठी झाडीबोली नाट्यसंमेलनात सहभागी होण्यासाठी पाठवावी व सहकार्य करावे.

**संलग्न:-** नाट्य संमेलनाचे प्रारुप.

**डॉ. श्याम खंडारे**
समन्वयक,
पदव्यूतर शैक्षणिक मराठी विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग

### वि. वा. शिरवाडकर जयंती तथा मराठी भाषा गौरव दिनानिमित्त

## झाडीबोली नाट्यसंमेलन

**दिनांक २७ फेब्रुवारी २०२४**

मराठी भाषा गौरव दिन व वि वा शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे झाडीबोली नाट्यसंमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. झाडीपट्टीतील सामाजिक समस्या, भाषा, बोली ,आचार -विचार, संस्कृती यांची ओळख व अभ्यास करण्याच्या दृष्टीने आणि झाडीपट्टी रंगभूमीचे जतन व संवर्धन करणे या उद्देशाने मा. कुलगुरू, डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाने गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने, दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे झाडीबोली नाट्यसंमेलन होत आहे. तरी या नाट्यसंमेलनात गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयातील (चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा) विद्यार्थ्यांनी सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा व जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे सूचित करण्यात येत आहे.

### झाडीबोली नाट्य संमेलन

**झाडीबोली नाट्यकलेचा जागर व स्पर्धा महोत्सव**

**अध्यक्ष :-** मा. डॉ. श्याम मोहरकर (प्रख्यात लेखक तथा नाट्यसमीक्षक)

**स्वागताध्यक्ष:-** मा. कुलगुरू, डॉ. प्रशान्त बोकारे, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**उद्घाटक :-** पद्मश्री मा. डॉ. परशुराम खुणे (प्रख्यात नाट्यकलावंत)

**प्रमुख उपस्थिती:-** मा. प्र-कुलगुरू, डॉ. श्रीराम कावळे, गो.वि.ग. मा. कुलसचिव, डॉ. अनिल हिरेखण, गो.वि.ग.

**नाट्य संमेलनाचे समन्वयक:-** डॉ. निळकंठ नरवाडे (सहा. प्रा. प. शै. मराठी विभाग गो.वि.ग.)

**झाडीबोली एकांकिका स्पर्धा**

**एकपात्री/नाट्यछटा स्पर्धा**

**स्पर्धेची पारितोषके:-** रोख रक्कम,स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरूप राहील.

**I) १. सर्वोत्कृष्ट एकांकिका पारितोषक** ८०००/- स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र

**उत्कृष्ट एकांकिका** ४०००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

**उत्तेजनार्थ एकांकिका** २०००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

**II) २. संहितालेखन/ दिग्दर्शन /स्त्री अभिनय /पुरुष अभिनय यासाठी प्रत्येकी एक सर्वोत्कृष्ट पारितोषक.**

**सर्वोत्कृष्ट** २०००/- स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

**III) ३. एकपात्री अभिनय /नाट्यछटा**

**सर्वोत्कृष्ट** ४०००/- स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

**उत्कृष्ट** २०००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

**उत्तेजनार्थ** १०००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

**स्पर्धेचे नियम व अटी**

- सदर स्पर्धा झाडीबोली मराठी भाषेतच होईल. ही स्पर्धा गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील महाविद्यालयांना लागू राहील.
- सादरीकरणात कोणत्याही जातीचा ,धर्माचा, राजकीय व्यक्तीचा उल्लेख नको. सामाजिक तेढ उत्पन्न होईल असे सादरीकरण नको. तसे आढळून आल्यास प्रवेश थांबवण्याचा वा रद्द करण्याचा अधिकार नाटय समितीस असेल.
- स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व प्रवेश अर्ज करण्यासाठी डॉ. निळकंठ नरवाडे मो. नं. ९५०३०८१७९० मो. नं. ८३२९३९४५१७ वर संपर्क करावा. प्रवेश अर्ज भरून पाठवण्याची अंतिम तारीख २० फेब्रुवारी २०२४ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत असेल. यानंतर आलेल्या प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत.
- स्पर्धेसाठी प्राचार्यांनी प्रमाणित केलेला साधा अर्ज भरून पाठवावा, त्यासोबत दोन संहिता प्रती, महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांची ओळखपत्र असावेत.
- एकांकिकेचा कालावधी कमीत कमी ३० मिनिटे व जास्तीत जास्त ४५ मिनिटे असेल. वेळेचे बंधन काटेकोरपणे पाळणे ही प्रत्येक संघाची कर्तव्य असणार आहे.
- सर्व कलावंतांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येतील.
- दहापेक्षा जास्त एकांकिका व एकपात्री अभिनय अधिकच्या आल्या तर प्राथमिक फेरी २३ फेब्रुवारी २०२४ ला घेण्यात येईल. निवडक एकांकिका, एकपात्री अभिनय दि. २७ फेब्रुवारी २०२४ या दिवशी सादर होतील.
- हे झाडीबोली नाट्यसंमेलन गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या ठिकाणी घेण्यात येईल. सदर स्पर्धा एकच दिवस चालेल. व स्पर्धेची वेळ सकाळी ८.०० ते रात्री १०.०० पर्यंत चालेल.
- झाडीबोली नाट्यसंमेलनातील स्पर्धकांना जेवण व प्रवास स्वतःच्या खर्चाने करावा लागेल. तो विद्यापीठास अनुज्ञेय राहणार नाही.